INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018

Special Issue-71

## समाज, संस्कृती आणि पर्यावरण

**Chief Editor -**

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**

Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

# स्वच्छता व सामाजिक परिवर्तन

प्रा. आर. बी काळे
समाजशास्त्र विभागप्रमुख,
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

## प्रस्तावना

स्वच्छता मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. भारत एक विकसनशिल देश आहे. भारतात आजही गरिबी, शिक्षणाच्या अभावामुळे अस्वच्छता आणि अशा अनेक समस्यांशी सामना करावा लागत आहे. या सर्व समस्यांना सपुष्टात आणण्याची आवश्यकता आहे. याची सुरवात स्वच्छता अभियानापासून केली गेली आहे. अभियानाच्या यशस्वीतेतून देशात सकारात्मक परिवर्तन घडून येवू शकते.भारताचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपिता म. गांधी यांच्या जयंतीचे अवचित्य साधून २ ऑक्टो.२०१४ पासून स्वच्छ भारत अभियानाची सुरवात केली. भारतात यापूर्वी १९८६ ला केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सुरू केला होता. १९९९ मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियानाला सुरवात केली होती. या सर्वाचा उद्देश देशात स्वच्छता निर्माण करणे हाच होता. जोपर्यंत देशातील प्रत्येक व्यक्ती स्वच्छतेप्रती जागरूक होत नाही तोपर्यंत हे अभियान यशस्वी होणार नाही. स्वच्छतेला आपल्या जीवनात स्वीकारून आणि कौटुंबीक शिक्षण प्रक्रियेत समाविष्ट करून येणाऱ्या भावी पिढीला स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.

## उद्देश

१. स्वच्छतेचा अर्थ समजावून घेणे
२. स्वच्छतेचे महत्व अभ्यासणे
३. स्वच्छतेमुळे होणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

## तथ्यसंकलन

प्रस्तूत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ मासिके इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

## स्वच्छतेचा अर्थ

स्वच्छता या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील sanitas या शब्दापासून झालेली आहे Sanitation अर्थात स्वच्छता असा अर्थ होतो. ज्यामध्ये पिण्याचे पाणी, केरकचरा, सांडपाणी, मानवी मलमुत्र इ. प्रवृत्तीचा समावेश केला जातो. त्यामुळे होणाऱ्या रोगांपासून दूर होवू शकतो. आरोग्यापेक्षा अधिक स्वच्छतेला महत्व दिले जात आहे. सर्वप्रथम स्वच्छतेचे समाजशास्त्राच्या संदर्भात डॉ. बिंदेश्वर पाठक यांनी मत प्रकट केले.

स्वच्छता ही एक व्यापक संकल्पना आहे. यात अनेक घटकांचा समावेश केला जातो. पर्यावरण आरोग्य, शिक्षण, शुध्द पाणि शौचालय, प्रदुषण, संतुलित आहार इ. यासारख्या बाबींचा समावेश होतो. त्यामुळेच स्वच्छता संपूर्ण समाजाला प्रभावित करत असते.

१. मानव निर्मित तयार होणारा कचरा, सांडपाणी मानवी मलमुत्र यांचा फेरवापर आणि त्याचे योग्य व्यवस्थापन करणे म्हणजे स्वच्छता अशी सर्वसाधारण व्याख्या करता येईल.
२. सामाजिक प्रतिष्ठा, सामाजिक विकास, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य हे स्वच्छतेचे मुलभूत आधार असून स्वच्छता हा नागरिकांचा हक्क आहे.

वरील व्याख्येवरून असे लक्षात घेता येते की, स्वच्छतेत वैयक्तीय ते सार्वजनिक स्वच्छता यांचा अर्तभाव होतो. त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने स्वच्छतेविषयी जागरूक असणे आवश्यक असून त्यामुळे सामाजिक विकास होण्यास मदत होईल.

ISSN : 2348-7143
October. 2018

**स्वच्छतेचे महत्व**

प्रत्येक व्यक्तीला जीवंत राहण्यासाठी श्वासाची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच स्वच्छतासुध्दा व्यक्तीच्या जीवनासाठी महत्वपूर्ण आहे. स्वच्छता ठेवणे एका व्यक्तीचे कार्य नाही पण त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्वच्छता फक्त आंतरिक नाही तर बाह्य पर्यारणाला प्रभावित करत असते. व्यक्तीचे अस्तित्व टिकविण्यसाठी स्वच्छता असणे आवश्यक आहे. स्वच्छतेचा आरोग्याशी प्रत्यक्ष संबध असल्याने आरोग्यासाठी स्वच्छता महत्वपूर्ण आहे. 'संपूर्ण जगामध्ये २.४ अब्ज लोकसंख्या आरोग्यपूर्ण स्वच्छतेच्या सुविधेपासून वंचित आहे ज्यात ८० टक्के लोकसंख्या दक्षिण आशिया मध्ये आहे. भारत आणि चीनबरोबर बांगलादेशमधील ७.३७ करोड, पाकिस्तानातील ७.२७ करोड आणि नेपाळ १.९८ करोड लोक स्वच्छतेच्या सुविधांअभावी जीवन जगत आहे.' स्वच्छतेमुळे देश सामाजिक विकासाची दिशा ठरवली जात असते सामाजिक संबधाच्या अस्तित्वासाठी निरोगी आरोग्य आवश्यक आहे तर निरोगी आरोग्यसाठी स्वच्छता आवश्यक आहे. समाजात स्वच्छता जागृतीसाठी जेवढे प्रयत्न होतात तेवढे स्वच्छताप्राप्तीसाठी होत नाहीत. सर्व वयोगटातील लोकसंख्येसाठी स्वच्छताघटक आवश्यक असून स्वच्छतेचे महत्व सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, सांस्कृतीक , धार्मीक, आर्थीक तसेच पर्यारण या सर्व क्षेत्राशी संबधित आहे. सर्व क्षेत्रातील उत्तम आरोग्य, स्वच्छता या घटकामुळे शक्य आहे. त्यामुळे स्वच्छतेचे महत्व लक्षात घेता येते.

**स्वच्छता एक सामाजिक मुल्य**

स्वच्छता हे सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून लहानपणापासून प्रत्येक व्यक्ती शिकत असते प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनात शिकून घेतलेले आणि अनुकरणीय व्यवहार करत असते. समाजात जर अस्वच्छता आहे तर याचा अर्थ असा आहे की, आपण स्वच्छतेचे मुल्य स्वीकारले नाही. ज्यापदध्तीने समाजातील लोक मुल्य आणि नियमणे तयार करतात त्या प्रकारे स्वच्छतेलाही सामाजिक मूल्य श्रेणीत समाविष्ट करू शकतो. जर समाजाने असे केले तर स्वच्छता व साफसफाई समाजाची परंपरा व सवय बनून समाजिक मूल्याच्या स्वरूपात स्वीकारली तर ती परंपरा व्यक्तीवर दबाव टाकू शकते. त्यामुळे स्वच्छतेचे कार्य करण्याची सवय प्रत्येक व्यक्तीची बनून जाईल व समाजातील अस्वच्छता दूर होण्यास मदत होईल.

**स्वच्छता व पर्यावरण**

व्यक्तीच्या जीवनात पर्यावरणाची स्वच्छता हा घटक महत्वाचा आहे. पर्यावरणाची स्वच्छता या घटकामुळे लोकांच्या आरोग्याच्या विविध पैलूंना नियंत्रीत करत असते. पर्यावरण स्वच्छतेची संकल्पना संपूर्ण समाजाला प्रभावित करते. शुदध हवा, पाणी औद्योगिक कचरा व रासायनिक तत्वापासून सुरक्षितता निर्माण करत असते. पर्यावरण स्वच्छतेमुळे शारिरीक विकास, आरोग्य यात परिवर्तन येत जाते. त्यामुळे व्यक्तीचे अस्तित्व टिकून राहते. व्यक्तीच्या आसपास असणारे सजिव निर्जीव, भौतिक अभौतिक घटक पर्यावरणात समाविष्ट असतात. पर्यावरणाच्या परिवर्तनाचा परिणाम प्रत्यक्ष मानवी जीवनावर होत असतो. त्यामुळे पर्यावरणीय स्वच्छतेमुळे सामाजिक परिवर्तन होण्यास मदत होते.

**स्वच्छता व आर्थिक विकास**

कोणत्याही देशाच्या विकासात स्वच्छता हा घटक महत्वाचा आहे. विकासाच्या मापदंडात स्वच्छता हा घटक ठेवण्यात आला आहे. अस्वच्छतेमुळे देशाचा आर्थिक विकास घटत जातो. 'विश्व बॅंकेचा अनुमान आहे की, अस्वच्छता असल्याने भारताचे सकल घरेलू उत्पादन GDP ६ टक्क्यापेक्षा अधिक नुकसान होते.' अस्वच्छता दूर करण्यासाठी तसेच स्वच्छतेच्या सुविधा वाढविण्यासाठी त्यावर खुप मोठ्या प्रमाणात खर्च होतो. त्यामुळे स्वच्छता

सर्वांनी अंगिकारली तर वैयक्तीक आर्थीक विकासाबरोबर देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल व अस्वच्छतेच्या दुष्परिणामापासून मुक्तता होईल.

**स्वच्छता व आरोग्य**

आरोग्य सर्व क्षेत्रात महत्वपूर्ण तत्व आहे. जोपर्यत व्यक्तीचे आरोग्य निरोगी नसेल तर ती व्यक्ती समाजाच्या विकासात योगदान देवू शकत नाही. आणि ती तेव्हाच निरोगी राहिल जेव्हा त्याला सकस आहाराबरोबर शुध्द पाणि स्वच्छ वातावरण मिळेल, म्हणून जोपर्यत आपल्या आसपास वातावरण शुध्द नसल्यास निरोगी आरोग्य निर्माण होणार नाही. आरोग्याचा अर्थ केवळ शारिरीक आजारापासून मुक्ती नसून पूर्णपणे बाह्य वातारणाशी अनुकूल असणे आवश्यक आहे. स्वच्छता व्यक्तीच्या जीवनासाठी महत्वपूर्ण आहे.८० टक्के आजार अस्स्वच्छतेमुळे होतात त्यामुळे आरोग्याला हानी पोहचविण्याचे अस्वच्छता हे मुख्य कारण असते. दुषीत पाणि, दुषीत वातावरणामुळे अनेक आजारांचा प्रसार होत असतो. उदा. मलेरिया, डायरीया, चिकनगुनीया, त्वचारोग इ. आजार जडतात. वैयक्तीक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छता ठेवल्यास अशा प्रकारच्या आरोग्याची हानी होणार नाही. तसेच प्रत्येक व्यक्तीची कार्यक्षमता वाढत जावून जास्तीत जास्त उत्पादन घेवू शकेल. अस्वच्छता हा घटक आरोग्यावर परिणाम करत असल्याने त्यातून आपल्याला स्वच्छतेच्या सवयीमुळे बदल घडवून आणत येवू शकतो. म्हणून स्वच्छता प्रचार प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे.

**सारांश**

स्वच्छता ही संकल्पना व्यापक स्वरूपाची आहे समाजातील सर्वच घटक स्वच्छतेशी संबंधीत आहेत. मात्र हे सर्व घटक स्वच्छता ही आपली जबाबदारी आहे असे मानायला लागेल तेव्हा स्वच्छतेतून सामाजिक परिवर्तन होण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ** –

१. वाघेला अनिल, स्वच्छता का समाजशास्त्र, पेज नं. १६, कल्पाज पब्लीकेशन दिल्ली, २०१५
२. तत्रैव पेज नं. १४४
३. shodhganga.inflbnet.ac.in.bitstream dated 8/10/2018
४. कवाडे चंद्रकांत वाघेला अनिल, स्वच्छतेतून सामाजिक बदलाकडे, पेज नं.२४, योजना, जाने.२०१५
५. जेटली अरूण, स्वच्छता मे निवेश का अर्थशास्त्र पेज नं. ०६ कुरूक्षेत्र, ऑक्टो. २०१७